# अध्यक्षांचे मनोगत



## श्री. कमलाकरदादा शिवाजीराव कदम

अध्यक्ष, रत्नागिरी जिल्हा मराठा सेवा संघ

**सस्नेह नमस्कार,**

**आपल्या आई तुळजाभवानी मंदिराच्या प्रथम वर्धापन दिनाच्या निमित्त आपण स्मरणिका प्रकाशनाच्या सुरूवातीस महाराष्ट्राची अधिशक्ती आई तुळजाभवानीला नतमस्तक होऊन महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री छत्रपत्री शिवाजी महाराज यांना मानाचा मुजरा.**

सहयाद्रीच्या कुशीत निसर्गरम्य, चौहूबाजूने सागराच्या लहरीने नटलेले व भगवान परशुरामाच्या पदस्पर्शाने पावन असलेले आपले कोकण अशा या पावन भूमीमध्ये मूळ धरलेल्या आपल्या **रत्नागिरी जिल्हा मराठा सेवा संघाची स्थापना दिनांक २७ नोंव्हेंबर १९९१ रोजी** राजे शिवछत्रपतीचे वारस धडाधडीचे मावळे यांनी समाज प्रबोधनाचा मानस ठेवून संघाची निर्मिती केली. खरतर महाराष्ट्राची कुळस्वामीनी आई तुळजाभवानी मातेचे खरस्थान आपल्या प्रत्येकाच्या हदयात आहे. तिचे मूर्तीमंत रूप जपण्यासाठी व ओघाने या माध्यमातून जमेल त्या प्रकारे जनसेवा करण्यासाठी शासन दरबारी अनेक वेळा भेटी, अर्ज विनंत्या करून प्राप्त झालेल्या पवित्र जागेची अलौकीकता अबाधित ठेवण्यासाठी संघाचे माजी **अध्यक्ष श्री. विकास महाडीक, अध्यक्ष, श्री. तुकाराम आंब्रे , सचिव कै. श्री. धनजंय भोसले** त्यांच्या कार्यकारणीतील सर्व पदाधिकारी तसेच सर्व सभासद, भक्तजण देणगीदार व हितचिंतक तसेच ज्या लहान मोठया सभासदांनी पुढकार घेतलेला त्या सर्वांना सर्वप्रथम माझा मानाचा मुजरा..

जुन्या जाणत्या मावळ्यांनी हाती घेतलेल्या संकल्पाला निश्चितच आकार देण्याची आता वेळ आली होती. त्यातच अवघ्या विश्वावर कोरोनासारख्या विषाणूचा हाहाकार सर्वत्र चालू होता. त्यामध्ये आपण सुटलो नाही संघाचे सक्रिय **सचिव कै. धनजंय भोसले, उपाध्यक्ष कै. काशिराम सुर्वे व कार्यकारणी सदस्य कै. अनंत सुर्वे** यांचे कोरोना कालावधीत दु:खद निधन झाले. त्यांच्या जाण्याने संघाचे मोठे नुकसान झाले. त्यातच पहिला स्लॅब पुर्ण होऊन मंदिराचे काम चालू होते. पुढील वाटचालीसाठी संघाचे मा. अध्यक्ष श्री. तुकाराम आंब्रे (आबा) यांच्या व सर्व सभासदांच्या

आग्रहाखातर आई तुळजाभवानीच्या आशीर्वादांनी मी दिनांक ४.७.२०२१ रोजी अध्यक्षपदाचा कार्यभार स्विकारला.

कार्यभार स्विकारल्यानंतर अवघ्या आठ महिन्याच्या कालावधीत आई तुळजाभवानीच्या अशिर्वादांनी तसेच सर्व कार्यकारणी सभासद, भक्तजण व हितचिंतकांच्या सहकार्याने आई तुळजाभवानीचे पाषाणी मंदिर व पाषाणीरूपी मुर्ती असणारे अतिभव्य दिव्य मंदिराची उभारणी करण्यात आली. **दिनांक २५ एप्रिल २०२२ मध्ये मुर्ती प्राण प्रतिष्ठापणा, सुवर्ण मुकूट, कळशारोहन व मंदिराचे उद्घाटन मोठया उत्साहात, भक्तीभावात आई तुळजाभवानी मंदिराचा कळशारोहन परमपुजनिय श्री वल्लभानंद सरस्वती स्वामी महाराज (गाणगापुर) यांचे शुभहस्ते करण्यात आले, या धार्मिक कार्यात माझा संघाचा अध्यक्ष या नात्याने हातभार लागला, हे मी माझे परम भाग्य समजतो.** तसेच सदर कार्यक्रमास **तुळजापुर देवस्थानाचे अध्यक्ष मा. श्री. अमरराजे कदम** याचीही या कार्यक्रमास उपस्थिती लाभली. त्याच्या मार्गदर्शनामुळेच आई तुळजाभवानी देवीची पुजा अर्चा व धार्मिक विधी हे सर्व तुळजापूर येथील तुळजाभवानी मंदिरात होत असतात त्याच पध्दतीने आपल्या मंदिरात साजरे केले जातात. मंदिराचे पावित्र्य टिकविल्यामुळे अल्पकालावधीत भक्तजण, सभासद यांच्या नवसाला व हाकेला धावणारी अशी ख्याती असणारी आपली आई तुळजाभवानी नावारुपाला आली आहे.

सर्व सभासद, भक्तजण व कार्यकारणीच्या सहकार्याने **"शिला तुमची अशिर्वाद भवानीचा"** या संकल्पनेतून **शिला अर्पण योजना** अस्तित्वात आणून मंदिरावरील पहिल्या सभागृहाचे स्लॅब, बांधकाम पूर्ण होऊन लवकरात लवकर तुळजाभवानी सभागृह पूर्ण होईल.

आई तुळजाभवानीच्या उभारणीमध्ये शिलादान, शिलाअर्पण, सुर्वणदान व वस्तुरूपी दान अशा विविध योजनेमधून सर्व सभासद भक्तजण, हितचिंतक व देणगीदार यांनी, सहकार्य केल्याबद्दल सर्वांचे मन:पुर्वक आभार मानतो.

**सर्व संघ बांधवांच्या व भक्तजणांच्या अथक परिश्रमाने व असीम श्रध्देने पूर्णत्वास आलेले आई तुळजाभवानीचे मंदिर म्हणजेच केवळ एक दगड विटांची वास्तू नसून सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या माणसाचे माणूसपण पाहणाऱ्या वैचारिक खजिन्याचा एक आदर्श नमुना ठरल्यास हीच खरी आई तुळजाभवानीची खरी भक्ती ठरेल.**

**॥ जय भवानी ॥** **॥ जय शिवराय ॥**

# सचिवांचे मनोगत



**श्री. संजय पुतळाजी दरेकर**
सचिव, रत्नागिरी जिल्हा मराठा सेवा संघ

**सस्नेह नमस्कार,**

सर्वप्रथम अखंड महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानीला नतमस्तक होतो तसेच महाराष्ट्राचे आराध्यदैवत श्री छत्रपती शिवाजी महाराज यांना मानाचा मुजरा करतो.

**आपल्या संघाची स्थापना सन १९९१ साली झाली** असून त्यावेळेच्या सर्व सभासदांनी नवीमुंबई, मुंबई व ठाणे येथील रत्नागिरी / सिंधुदूर्ग जिल्हयातील मराठा समाज एकत्र यावा या उदेदशांनी संघाची स्थापना झाली. **संघाचे कामकाज अत्यंत प्रगतशील असताना सन २००८-२००९ या वर्षात संघाचा मी आजीव सभासद झालो. मुळात संघाची निर्मिती करताना मुंबईस्थित आपला मराठा समाज एकत्र येऊन एकमेकांच्या सुख-दु:खात मदत करणे हा प्रमुख उद्देश आपला होता.** खरोखर संघाचे काम अत्यंत चांगल्या पध्दतीने चालू होते, संघाची प्रगती व वाटचाल उत्तमरित्या चालू होती. सदर वाटचालीमध्ये ज्या सभासद, कार्यकारणी सदस्य व पदाधिकारी यांचे मोलाचे सहकार्य होते, त्यांचे मी सर्वप्रथम मनापासून आभार मानतो.

संघाचे काम उत्तमरित्या चालू होते परंतू आपणास माहित आहे की सन २०२० ला अवघ्या विश्वावर कोरोनाविषाणुंचा प्रादुभाव होता. त्यामधुन आपल्या संघाची मोठया प्रमाणात हानी झाली. तद्नंतर आदरणीय संघाचे कार्यसम्राट अध्यक्ष मा. श्री. कमलाकरदादा कदम यांच्या नेतृत्वाखाली आमची कार्यकारणी गठीत झाली व माझी कार्यकारणी सदस्य म्हणून निवड झाली हे मी माझे भाग्य समजतो. आदरणीय दादांच्या नेतृत्वाखाली सर्वप्रथम आम्ही आई तुळजाभवानी देवीच्या मंदिराच्या बांधकामाला सुरूवात केली. सर्व सभासद, भक्तजण, देणगीदार व हितचिंतक यांच्या सर्वांच्या सहकार्याने आई तुळजाभवानीचे मंदिर **अवघ्या ८ महिन्यात उभे करून दिनांक २५ एपिल २०२२ रोजी अत्यंत उत्साहात व जल्लोषात पाषाणी रूपी मंदिर, मुर्ती व कळशारोहन यांचे धार्मिक विधीवत पुजा अर्चा करून आई तुळजाभवानी मंदिराचे उद्घाटन करण्यात आले.** यामध्ये माझा सहभाग होता, हे माझे परमभाग्य समजतो.

**प्रथम वर्धापना दिना निमित्ताने प्रकाशित होणाऱ्या स्मरणिकेस माझ्या शुभेच्छा तसेच सर्व सभासद, भक्तजण, हितचिंतक व देणगीदार यांना आई तुळजाभवानीचा आशिर्वाद लाभो, हीच प्रार्थना !**

|| जय भवानी || || जय शिवराय ||

# खजिनदारांचे मनोगत



**श्री. अशोक सहदेव तावडे**

खजिनदार, रत्नागिरी जिल्हा मराठा सेवा संघ

**सस्नेह नमस्कार,**

**सभासद बंधू आणि भगिनींनो**

**दिनांक २७ नोव्हेंबर १९९१ रोजी स्थापन झालेल्या आपल्या मंडळाला येत्या यावर्षी ३२ वर्षे पूर्ण होत आहेत.** पूर्वेस डोंगर दराने नटलेल्या पश्चिमेस विस्तीर्ण अशा सागर आणि वेढलेल्या अशा निसर्गरम्य कोकणात आपण जन्माला आलो. सृष्टीत अवतरलेला जणू काय स्वर्गच म्हणावा लागेल परंतु हे कोकण सोडून आपल्याला नोकरी निमित्त मुंबई, नवी मुंबई येथे यावे लागले. इथे येऊन आपण सर्वजण एकत्र जमू लागलो या माध्यमातून **आपल्या संघाची स्थापना झाली आणि आपण सर्व एका रेशीमगाठीत बांधले गेलो.**

मग महिलांसाठी हळदी कुंकू, गुणवत्त विद्यार्थ्यांचा सत्कार, वार्षिक स्नेहसंमेलन, आरोग्य विषयक शिबिर अशा कार्यक्रमांची रेलचेल सुरु झाली. इतिहासाकडे आज मागे वळून पाहताना एखाद्या वारुळा मधून बाहेर पडणाऱ्या मुंग्याप्रमाणे असंख्य आठवणी व प्रसंग डोळ्यासमोर उभे राहतात सिडको कडून मंडळाला दिलेला भूखंडाचा ताबा, मंदिराच्या पायाभरणीचा अनुभव, मंदिर बांधत असताना सर्वांची धडपड, देवीच्या स्थापनेच्या वेळी सर्वांची एकी आणि सर्वांच्या प्रययत्नाने आई तुळजाभवानी मंदिराचा कलशारोहन या आनंदमय वातावणाने खरंच मी भारावून गेलो आणि या सगळ्यामध्ये मी खजिनदार म्हणून काम करत असताना स्वत:ला मी भाग्यवान समजतो.

संघाच्या या खडतर वाटचालीत अनेक अडचणी, समस्या, प्रसंगी वादळे सुद्धा निर्माण झाली. परंतु ते काय जाज्वल निष्ठेने व अभेद एकजुटीने शमविण्यात यश आले. **नवी मुंबईतील एकमेव भवानी मातेचे मंदिर उभारण्यात संघाला यश आले.** आज ऐरोलीतील व नव्या मुंबईतील सर्व भाविक मोठ्या श्रद्धेने या भवानी मातेच्या मंदिरात येऊन दर्शन घेतात व आई तुळजाभवानी चरणी नतमस्तक होतात. **मंदिरामध्ये दर पौर्णिमेला महाप्रसाद असतो, नित्यनियमाने दररोज संध्याकाळी सात वाजता आरती होते. शारदीय नवरात्र उत्सव व चैत्र नवरात्र उत्सव साजरा केला जातो, त्यात विशेष म्हणजे गोंधळ व धार्मिक कार्यक्रम साजरे केले जातात.**

या सर्व उभारणीमध्ये सभासद, देणगीदार, हितचिंतक यांचे आम्हांला मोलाचे सहकार्य लाभले, त्यांचे मन:पूर्वक आभार सदर प्रसंगी मी मानत आहे.

**आई तुळजाभवानी आपणा सर्वांच्या मनोकामना पूर्ण करो, हीच प्रार्थना!**

ज्यांच्या संघ निष्ठेने,
असमान्य कर्तृत्वाने,
संयमी व दमदार नेतृत्वाने
आणि
अथक कार्याने
संघ कार्य गतिमान होऊन
संघ ३२ वर्षांची यशस्वी
वाटचाल पूर्ण करु शकलो !

**संघाच्या त्या सर्व दिवंगतांना**
**भावपूर्ण श्रद्धांजली !**

रत्नागिरी जिल्हा मराठा सेवा संघ

स्थापना १९९१ )

( नोंदणी क्र. : अेफ / ३४५१ ठाणे

# रत्नागिरी जिल्हा मराठा सेवा संघ

## पदाधिकारी



**श्री. कमलाकरदादा शिवाजी कदम**
अध्यक्ष



**श्री. संजय पुतळाजी दरेकर**
सचिव



**श्री. अशोक सहदेव तावडे**
खजिनदार



**ॲड.सौ. संध्या शांताराम सावंत**
उपाध्यक्ष



**श्री. मनोहर रामचंद्र भोसले**
सहसचिव



**श्री. सुदेश वसंत शिर्के**
सहखजिनदार

स्थापना १९९१ )  ( नोंदणी क्र. : अेफ / ३४५९ ठाणे

# रत्नागिरी जिल्हा मराठा सेवा संघ

## कार्यकारिणी सदस्य


श्री. विजय अमृतराव साळवी


सौ. स्वाती देवेंद्र देसाई


श्री. मगेंश मनोहर महाडिक


श्री. महेश महादेव सकपाळ


श्री. संतोष आत्माराम मोरे


श्री. रुपेश रघुनाथ कदम


श्री. अमित भिमराव भोसले


श्री. स्वप्निल सतिश देसाई

स्थापना १९९१ ) ( नोंदणी क्र. : अेफ / ३४५९ ठाणे

# रत्नागिरी जिल्हा मराठा सेवा संघ

## कार्यक्रम नियोजन समिती



श्री. संतोष आत्माराम मोरे



श्री. रुपेश रघुनाथ कदम



श्री. अमित भिमराव भोसले



श्री. स्वप्निल सतिश देसाई



ॲड.सौ. संध्या शा. सावंत



सौ. स्वाती देवेंद्र देसाई



सौ. नेहा मंगेश महाडिक



सौ. श्वेता सुदेश शिर्के



सौ. दिप्ती अमित भोसले



सौ. प्रज्ञा चंद्रकांत महाडिक



सौ. पवित्रा शुभम कदम



सौ. श्रावणी सचिन शिंदे



सौ. अस्मिता अजय साळुंखे



सौ. समिधा संतोष आंब्रे

# इतिहासात डोकावताना .....

***सर्व रत्नागिरी जिल्हा मराठा सेवा संघाचे***
***सर्व सभासद, हितचिंतक, देणगीदार व भाविकजन,***
***यांसी सप्रेम नमस्कार,***

रत्नागिरी जिल्हा मराठा सेवा संघाच्या कार्यकारिणीच्या वतीने आज मनोगत मांडताना खूप आनंद होत आहे. आपल्या संघाची स्थापना १९९१ साली आपल्या सभासदांनी केली, त्यावेळेची त्यांची भावना लक्षात घेता मुंबई शहर, उपनगर व ठाणे जिल्हा येथे जो काही आपला कोकणस्थ मराठा समाज आहे, तो एकत्र येऊन

**शिवरायांनी घालू दिलेली, उच्च मराठा तत्वे जपतो, तो मराठा**
**तुकोबांनी मांडलेली, उच्च मराठा तत्वे जो जगतो, तो मराठा**
**महात्मा फुले, राजश्री शाहू महाराज, गायकवाड राजे यांनी**
**दाखवलेल्या मार्गाने चालतो, तो मराठा...**
**मराठा म्हणजे जो सत्यासाठी, न्यायासाठी, सभ्यतेसाठी व मानवतेसाठी**
**इत्यादी उच्च मानवी तत्वाज्ञानासाठी जगतो ... लढतो, तो मराठा.**

या प्रेरणेने समाजातील कला-क्रिडा-सांस्कृतिक व सामाजिक या ध्येयाने समाजाच्या विकासासाठी स्थापन केलेला संघ म्हणजेच आपला रत्नागिरी जिल्हा मराठा सेवा संघ ऐरोली नवीमुंबई. सदर संघाच्या जडणघडणीत आजीव माजी पदाधिकारी, कार्यकारणी सदस्य व सभासद बंधुभगिनी तसेच हितचिंतक, देणगीदार या सर्वांचे मोठे योगदान आहे. म्हणूनच आपला संघ आज मोठा वटवृक्ष झालेला आहे. यासाठी सर्वप्रथम सर्वांचे त्रिवार अभिवादन करतो.

महाराष्ट्राच्या या पवित्र भूमीमध्ये सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरेमध्ये कुलदेवतेला अनन्य साधारण महत्व आहे. हिंदूच्या देवदेवता अनेक असल्यातरी आपल्या महाराष्ट्राची व राजे श्री छत्रपती शिवाजी महाराजांची कुळस्वामिनी म्हणून आई तुळजाभवानी ओळखली जाते. माता क्षात्रतेजाची स्फुर्ती देवता, प्रेरणाशक्ती असून नवसाला व संकटाला धावून येणारी अशी आई तुळजाभवानीची ख्याती आहे.

यासर्व प्रेरणेने आणि आपल्या सर्व सभासद हितचिंतक व भाविक यांच्या पुढाकाराने नवी मुंबई येथे आपल्या रत्नागिरी जिल्हा मराठा सेवा संघाच्या माध्यामातून **माजी अध्यक्ष श्री. विकास महाडिक व त्यांच्या कार्यकारणीने केलेल्या कामामुळे सिडकोकडून भूखंड विकत घेण्यात आला.** संघाच्या ध्येय धोरणानुसार तसेच समाजातील सभासद व गोर गरिब दिनदुबळ्या लोकांची सेवा व्हावी यासाठी मंदिर उभारणीबरोबर समाजभवनाची वास्तू उभारण्यात यावी हा मोठा संकल्प तत्कालीन **माजी अध्यक्ष श्री. तुकाराम (आबा) आंब्रे, स्वर्गीय श्री. धनंजय भोसले व त्यांच्या कार्यकारिणीने हाती घेतला आणि सन २०१९ मध्ये चैत्र शारदीय नवरात्रीच्या उत्सवामध्ये पहिल्या माळेला म्हणजेच दि. २९ सप्टेंबर २०१९ रोजी प्रत्यक्ष कामास सुरुवात होऊन, पहिला स्लॅब पूर्णत्वास झाला.**

संघाच्या ध्येय धोरणानुसार तसेच समाजातील सभासद व गोर-गरिब दिनदुबळ्या लोकांची सेवा व्हावी यासाठी मंदिर उभारणीबरोबर समाजभवनाची वास्तू उभारण्यात यावी हा मोठा संकल्प घेतला आहे. त्या अनुषंगाने

संघाच्या सर्व सभासद व कार्यकारणीने मोठ्या विश्वासाने सदर जागेवर महाराष्ट्र कुळस्वामिनी आई तुळजाभवानीच्या मंदिराची उभारणी पुर्ण झाली आहे. संघाच्या माध्यमातून समाजउपयोगी असे विविध उपक्रम राबविण्यात येत असतात. आजस्थितीत आम्ही आपणास अभिमानाने सांगू इच्छितो की, आई तुळजाभवानीच्या मंदिराचे काम आपल्या सर्व सभासद, देणगीदार व हितचिंतक यांच्या सहकार्याने पूर्ण झाले आहे. या अनुषंगाने महाराष्ट्राच्या कुळस्वमिनीचे व तुम्हा आम्हांची श्रध्दा असणाऱ्या आई तुळजाभवानीची हेमांडपथी शैलीतील सुबक, पाषाणी देवालय वास्तूची उभारणी केली आहे

आई तुळजाभवानी मातेच्या देवालयाच्या उभारणीसाठी निधी शिलादान रुपाने संकलित केला होता. यासाठी रु. २,५०१/- मुल्य असणारी **'जनशिला'**, रु. १०,००१/- मुल्य असणारी **'ताम्रशिला'**, रु. २५,००१/- असणारी **'रौप्यशिला'**, रु. ५०,००१/- मुल्य असणारी **'सुवर्णशिला'** व रु. १,००,००१/- मुल्य असणारी **'हिरकशिला'** अशा प्रकारच्या शिलादान करण्यासाठी संघाने केलेल्या आव्हानाला उत्सफूर्त असा प्रतिसाद मिळत आहे. शिलादान करणाऱ्या प्रत्येक दात्यास शिलादान पत्र सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे. सर्व शिलादान करणाऱ्या प्रत्येक दात्याचे नाव मंदिरात फलकावर लावण्यात येतात.

**आई तुळजाभवानीच्या मूर्तीची व राजे छत्रपती शिवाजी महाराज सिंहासनाधिशरुपी मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना, कळशारोहण व मंदिराचे उद्घाटन धार्मिक विधीवर पूजेने व मोठ्या भक्तीभावात गुरुवार दि. २१ ते सोमवार दि. २५ एप्रिल २०२२ या कालावधीत संपन्न झाला.**

केवळ देवालयाची उभारणी एवढेच उद्दिष्ट नाही तर या माध्यमातून समाजभवन बांधणे, समाजउपयोगी कार्यक्रम राबविणे, येणाऱ्या भाविकांसाठी सेवासुविधा निर्माण करणे व समाजबांधवांच्या अडचणी सोडविणे इत्यादी उपक्रम देखील साधावयाचे आहे. संघ नेहमीच सामाजिक बांधिलकीसाठी कटिबद्ध राहिलेला आहे. सामाजातील असंख्य दिनदुबळ्या व्यक्तींना आज आधाराची गरच आहे हे लक्षात घेऊन सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय, क्रिडा व सांस्कृतिक क्षेत्रात सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून संघातर्फे सहाय्य केले जात आहे. या मदतीचा ओघ आणखी वाढावा यासाठी कुलस्वामिनी मातेच्या देवालय उभारणीच्या माध्यमातून जमा होणाऱ्या निधी मधून काही रक्कम खर्च करण्याचे संघाने ठरविले आाहे. आपण आई तुळजाभवानी चरणी शिलादान रुपाने अर्पण केलेला प्रत्येक रुपया सत्कारणी लागेल व हे दान नि:संशय सत्पात्री असेल याची संघ ग्वाही देत आहे.

आई तुळजाभवानीच्या वास्तूची उभारणी हजारो-लाखोंच्या हाताने झाली तरच ती लोकदेवता होऊन देवत्वाची निर्मिती अनुभूती होते असे म्हटले जाते, याकरिता देवालयासाठी सुध्दा समस्त सभासद बांधव, देणगीदार, हितचिंतक, सगेसोयरे व स्नेहीजणांची सेवा आई तुळजाभवानी चरणी रुजू व्हावी अशी इच्छा आहे. जसे प्रभू श्री रामांचे मंदिर अयोध्येमध्ये कोट्यावधी भाविकांच्या श्रध्देतून साकार होत आहे. आपल्या भवानी मातेचे देवालयसुध्दा हजारो समाजबांधव, देणगीदार भाविक, समस्त नवी मुंबईकर व स्नेहीजन यांनी दिलेल्या दानस्वरुप शिलादान मधून साकार झाले व त्याव्दारे मातेच्या प्रती असलेली भक्ती चिरंतन जागृत रहावी झाली.

आमच्या कार्यकर्त्यांनी घेतलेले अथक परिश्रम आणि सभासद, हितचिंतक, देणगीदार, वर्गणीदार, जाहिरातदार यांच्या मुळेच संघ विशेष यशस्वी वाटचाल चालु आहे. पुन:श्च सर्वांचे मन:पूर्वक आभार....

**कार्यकारी मंडळ,**

**रत्नागिरी जिल्हा मराठा सेवा संघ, ऐरोली नवी मुंबई**

।। जय भवानी ।। ।। ॐ ।। ।। जय शिवराय ।।

स्थापना १९९१ ) ( नोंदणी क्र. : अेफ/ ३४५९ ठाणे

# रत्नागिरी जिल्हा मराठा सेवा संघ








## संघाचे ध्येय व उद्दिष्ट्ये

संघाचे मराठा भवन निर्माण करणे.

सर्व मराठा बांधवांना एकत्रित करुन समाज सर्वांगिण विकास करणे.

सभासदांच्या पाल्यांना शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक सहाय्य करणे.

समाजातील दिनदुबळ्या नागरिकांना मदत करणे.

सभासदांसाठी विविध प्रकारच्या शिबिरांचे आयोजन करणे.

आई तुळजाभवानी मंदिरात विविध धार्मिक तसेच सामाजिक कार्यक्रम राबविणे.

नागरिकांना रुग्णवाहिका उपलब्ध करुन देणे.

महिला रोजगार उद्योग या बाबत शिबिरांचे आयोजन करुन प्रोत्साहन देणे.

महिलांच्या स्वयं: संरक्षण प्रशिक्षण देणे.

वृध्दाश्रम, दवाखाना, रुग्णालय बांधणे.

# प्रस्तावित मराठा भवन

